# राशिभविष्य - जून, २०१३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध शारीरिक, मानसिक, आर्थिक बाबतीत प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे मनावर संयम ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळास सामोरे जा. वाढता खर्च, वित्तहानी, फ़सवणूक व जमेपेक्षा खर्च अधिक अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत अधिक धनप्राप्तीसाठी खूप धडपड करावी लागेल. त्यामुळे उष्णता भडकून डोळे, घसा, दात यांचे अनारोग्य सहन करावे लागेल. तसेच थकवा येणेही संभवते. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे  अकारण शत्रुत्व निर्माण होईल. जपा. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. सप्तम स्थानी असलेल्या शनि-राहूमुळे जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, तसेच मन विकृत झाल्यामुळे दोघांतील मतभेदांमुळे वा अन्य कारणांनी  दांपत्यजीवनातील सुखात थोडी बाधा येणे संभवते. महिन्याचा उत्तरार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, साहित्यिकांना, सर्व प्रकारच्या कलाकारांना अनुकुल व लाभदायक होईल. खाजगी नोकरी असणारांना मात्र मनस्ताप व कष्ट परिश्रमानेच काळ व्यतीत करावा लागेल. प्रवासयोग येतील. पण भावंडांकडून गैरसमजाने त्रास होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य लाभेल. ज्या मंडळींजवळ शेतीवाडी आहे त्यांना शेतीवाडीपासून अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होण्याची शक्यता दिसते. मात्र वाहनांपासून धोका संभवतो. जपा. श्रद्धेने गणेश उपासना करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीच्या वर्तमान स्वाभाविक दोषांमुळे व मूळच्या हट्टी स्वभावामुळे या महिन्याचा काळ शारीरिक-मानसिक दृष्ट्या अनारोग्यकारकच असा व्यतीत करावा लगण्याची शक्यता दिसते. श्रम व दगदग होऊन थकवा जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. तसेच काही मंडळीना नेत्रविकार त्रस्त करतील. काही मंडळीना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते.  महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. तसेच आप्तेष्टांशी वाद, मतभेद होणे संभवते. जपा. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. अपेक्षित अर्थलाभ होईल. नोकरदार मंडळींना पगारवाढ मिळू शकेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यापार किंवा स्वतत्र व्यवसाय असणारांना सर्व प्रकारे प्रगतीशील काळ असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात काही मंडळीना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. काही मंडळीना मानाचे. प्रतिष्ठेचे स्थान मिळू शकेल. कला क्षेत्र, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना महिन्याचा शेवटचा सप्ताह अधिक अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना त्यांच्याकडूनच अधिक अर्थलाभ होईल. कोळसा व्यापारी, लोखंड व्यापारी, वकिली व्यवसाय असणरांना मात्र काळ अपेक्षेनुसार अनुकुल असणार नाही. पण द्रव पदार्थांचे व्यापारी आणि मानसिक रोग तज्न्य  यांना मात्र काळ अनुकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी मित्रांशी होणारे वाद, भांडणे होणे टाळल्यास मनापासून अध्ययन करणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर

शिवोपासना अनुकुल होईल.

(२)

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या संपूर्ण काळात एकूण सर्व ग्रहस्थिती फ़ारशी अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. रवि-मंगळ हे दोन्ही महत्त्वाचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून सतत मनाविरुद्ध व मनस्ताप देणाऱ्या घटना घडविणारे असेच असल्याचा अनुभव येईल. गैरसमजुती, भांडणे, होणारी मानहानी जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा होणारा त्रास, आर्थिक समस्या अशापैकी विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता जाणवते. तसेच काही मंडळीना गहरे नैराश्य येणे शक्य आहे. या राशीच्या रक्तदाब व हृदयविकार असणाऱ्या मंडळीनी विशेष जपावे. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि-राहूमुळे या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता नाही. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची शैक्षणिक समस्या, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. दगदग करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांना शारीरिक-मानसिक अस्वास्थ्यामुळे किंवा कुसंगतीमुळे मनापासून अध्ययन करणे अशक्य होईल. त्यामुळे या राशीच्या मंडळीना अपेक्षित असे कौटुंबिक सुखसमाधान मिळेलच, याची खात्री नाही. पण हा राहू दलाली, कमिशनवर व्यवसाय करणारांना मात्र अनुकुल व लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे आरोग्यविषयक समस्या अटोक्यात राहील, व हा ग्रुरु ग्रह बौद्धिक व्यवसाय क्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. गुरु-नेपचूनन शुभ योगामुळे सूचक स्वप्ने पडतील. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अनपेक्षित अर्थलाभ व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. नोकरदार मंडळीना काळ फ़ारसा अनुकुल असणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यात मग्न असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पाण्याशी संबंध असलेले व्यवसाय असणारांना जलभय आहे; तसेच विषभयही संभवते. जपा. मंगळामुळे काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल. पण हाच मंगळ मैत्रीत वितुष्ट निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सामान्य नोकरी-व्यवसाय असणाऱ्या मंडळीना कठोर परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरीच करावी. काही तरी नवीन सुरू करण्याचा विचारही करू नये. शनि-राहू व गुरु ग्रहांमुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. कौटुंबिक वाद, न पटणे, स्थावर संपत्तीबाबतचे वाद उफ़ाळून येतील व असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच कुटुंबात अनिष्ट घटना घडणेही संभवते..जपा. त्यामुळे अपेक्षित गृहसौख्य लाभेलच याची खात्री नाही. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रहाच्या प्रतिकुलतेची भर पडून असह्य मानसिक त्रास सहन करावा लागेल. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व कालाची प्रतिकुलता

सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल.



**(५) सिंह -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ नोकरीत अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र खाजगी नोकरीत असणारांना मात्र कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच वरिष्ठांशी मतभेद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यावसायिकांना व्यवसायात येणाऱ्या अडचणींना सामोरे जावे लागेल. वकिली, अकौंटन्सी, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शिक्षणक्षेत्र, कलाक्षेत्र अशा कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांनाही काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नवे मित्र मिळतील व त्यांच्यापासून सुखसमाधान लाभेल. मात्र भावंडविषयक समस्या मनस्ताप देतील किंवा काही कारणाने बंधुसुखात बाधा उत्पन्न होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अपेक्षित शिक्षण संस्थेत प्रवेश मिळू शकेल. ज्यांचा परीक्षेचा निकाल जाहीर व्हावयाचा असेल त्यांना त्या परीक्षेत अपेक्षित यश मिळू शकेल. या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री देता येत नाही.. तसेच वैवाहिक जीवनातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघातभय आहे. वाहने सावधानतेने व नियंत्रित वेगाने चालवा. अग्नी, वीज यापासून जपा. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्र वाचा. "

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ  असल्यामुळे त्यांना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना होईल. तसेच काल्पनिक चिंता त्रस्त करतील. तरीही या राशीच्या काही मंडळीना रक्तविकार, मुखदंत रोग किंवा त्वचारोगाचा आजार त्रस्त करीलसे दिसते. जपा. विचारांच्या तंद्रीत कोणतेही काम न करता सतत सावधानतेनेच आचरण करा. नपेक्षा अपघात भय संभवते. जपा. कोणावरही फ़ाजील विश्वास टाकू नका. फ़सवणूक होणे संभवते. जपा. काहीही कारणाने कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. सहनशीलतेने आचरण करूनच प्रतिकुल काळ व्यतीत करा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि-राहूमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करतील. जपा. काही मंडळींना कोर्ट प्रकरणांना सामोरे जावे लागेल. अशा परिस्थितीत गुरुसारख्या शुभ ग्रहांची काही प्रमाणात अनुकुलता लाभेल, मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. विशेष करून महिन्याचा अखेरचा सप्ताह समाधानकारक अवस्थेत पार पडेल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या लोकांच्या ओळखीतून अनुकुल घटना घडतील. महिन्याच्या पूर्वार्धात मात्र मानसिक ताण, मानहानीच्या घटना मनस्ताप देतील. तसेच वडील व्यक्तींचा विरोधही सहन करावा लागेल. जपा. बौद्धिक कार्यक्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण कलाक्षेत्रातील मंडळीना मात्र महिन्याचा अखेरचा सप्ताहच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अपेक्षित शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळू शकेल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. नियमाने "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शारीरिक कष्ट, अनारोग्य व मनस्ताप



सहन करावा लागेलसे दिसते. शनि ग्रहाची साडेसाती चालू आहेच. त्यामुळे या प्रतिकुल काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यास सज्ज राहिले पाहिजे. शनि-मंगळ हे दोन्ही शत्रु ग्रह प्रतिकुल आहेत. एक मनाचे आरोग्य नष्ट करतो तर दुसरा शारीरिक कष्ट करावयास लावून उष्णतेचे विकार उत्पन्न करतो. शिवाय राहूमुळे अपमानकारक घटनांना तोंड द्यावे लागते. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात अधिक शारीरिक-मानसिक त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. सध्या या राशीच्या मंडळीना योग व अध्यात्म याबाबत आवड निर्माण झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर भावनाशील मन असल्यामुळे उपासनेद्वारे मनावर ताबा मिळविणे शक्य होईल. सतत अति विचार करू नका. नपेक्षा डोकेदुखीची व्यथा जडेल. काहींना मेंदूविकारही जडू शकेल. जपा. या राशीच्या काही मंडळीना मुदतीचा ताप, काहींना मूळव्याधीसारखे उष्णताविकार, काहींना अपघात अशा परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण करण्याची शक्यता दिसते. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य कारणांनी अपेक्षित वैवाहिक सुखातही बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना चंचल मनस्थितीवर नियंत्रण ठेवूनच शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर कुलस्वामीची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल. नियमाने दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-शनि हे तिन्ही दादा ग्रह प्रतिकुल असणार आहेत. शिवाय शनि ग्रहाची साडेसाती चालू आहेच. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी मन शांत ठेवावे, नव्या योजनांचा विचारही न करता आहे त्याच स्थितीत सुखासमाधानाने काळ कसा व्यतीत करता येईल ते पाहावे. महत्त्वाची बाब म्हणजे दाम्पत्यजीवनात काहीही कारणाने वाद, भांडणे होणे संभवते. त्यात जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या असेल तर अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारांत संशयाने भागीदारी तुटू नये यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. तरच सर्व प्रकारचे आरोग्य चांगले राहू शकेल. नपेक्षा उष्णता भडकून उष्णतेचे विकार बळावतील. त्याचप्रमाणे काही मंडळीना अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी आजारांशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत बुध-गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. तसेच काही मंडळीना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळीना गुरुकृपा वा थोरकृपा प्राप्त होईल व त्यामुळे प्रसिद्धी मिळू शकेल. शनि ग्रहाच्या प्रतिकुलतेमुळे मानहानीच्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र-हर्षल शुभ योगामुळे कलाकार मंडळीना कलाविष्कारास पोषक परिस्थिती निर्माण होईल. उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव

येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु** - या राशीच्या मंडळींचे मन सध्या अत्यंत भावनाशील झाले असावे असे वाटते. त्यामुळे



मनासारखे अपेक्षित असे काही न घडल्यास लगेच गहरे नैराश्य येत असावे. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली व्यवसाय, अकौंटन्सी, वैद्यकीय संशोधन, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. राजकारणात असणारांना एखादे सत्तेचे पद किंवा अधिकारपद मिळू शकेल. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. अध्यात्म, गूढविद्या अशापैकी कशाची ओढ असल्यास त्यात उपासना व सद्गुरु मार्गदर्शनाने यश व मन:शांती मिळू शकेल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील, किंवा नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहींना मानाचे स्थान प्राप्त होईल. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांना भरभराट होत असल्याचा अनुभव येईल. पण स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करीलसे दिसते. जपा. तसेच संततिसुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. त्याचप्रमाणे कुसंगतीची बाधा झाल्यास धननाश होणेही संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही कारणाने अडथळे येण्याची शक्यता जाणवते. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपसना अनुकुल होईल. तसेच नियमितपणे "बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे" पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:ची आरोग्यविषयक समस्या त्रस्त करील. त्याचप्रमाणे नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. त्यामुळे मन अस्वस्थ राहील. तसेच छुप्या शत्रूंकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. वकिली व्यवसाय, अन्य उच्च,चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, साहित्यनिर्मिती, राजकारण, शास्त्रीय संशोधन व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात जीवनसाथीच्या किंवा स्वत:च्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाला आलेले नैराश्य अशापैकी विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. दिनांक १८ ते २० या तीन दिवसांच्या काळात काही अनुकुल/प्रतिकुल अशी अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता दिसते. कौटुंबिक जीवनात कोणाशीही पटत नसल्याचा अनुभव येईल. त्यामुळे घरात सतत वाद, भांडणे होणे संभवते. त्यामुळे गृहसौख्य लाभणेही अशक्य होईल. जपा. आर्थिक व्यवहार सावधानतेनेच करा. आर्थिक घोटाळे होणे, अनपेक्षित आर्थिक जबाबदारी येऊन पडणे, फ़सवणूक होणे अशापैकी कारणांनी आर्थिक

चिंता निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल व लाभदायक होईल. दररोज नियमितपणे गणपति-अथर्वशीर्ष व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.



**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही शीघ्र असतील. त्याचा परिणाम म्हणून थोडेही काही मनाविरुद्ध घडले की लगेच मन उदास होत असावे असे वाटते. तसेच सतत चंचल, अस्थिर बुद्धीमुळे हातून अविचारी आचरण घडत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत फ़टकळ बोलणे, अविचाराने खर्च होणेही होत असल्याची शक्यता जाणवते. असे घडत असेल तर या राशीच्या मंडळीनी मनस्थिती सुधारण्यासाठी आध्यात्मिक उपासना जरूर करावी, हे उत्तम. या महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक वाद, भांडणतंटे, गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेचा वा स्थावर संपतीबाबतचा असह्य त्रास अशापैकी घटनांमुळे या राशीची मंडळी त्रस्त होण्याची शक्यता दिसते. त्याचा परिणाम महिन्याच्या उत्तरार्धात सर्व प्रकारच्या आरोग्यावर होणेही संभवते. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व बरे वाटेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित उच्च शिक्षण शाखेत प्रवेश मिळू शकेल. या राशीच्या मंडळीनी महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात सर्व प्रकारच्या अरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. या राशीच्या काही मंडळीना प्रवास योग संभवतात. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, या राशीच्या मंडळीना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागेल. काळाची प्रतिकुलता ध्यानात घेऊन या राशीच्या मंडळीनी सतत मनावर संयम ठेवून, सहनशील बनून नम्रतेने आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. कुलदेवतेची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अत्यंत चंचल, अस्थिर, लहरी असा झाला असण्याची शक्यता दिसते. कोणी केलेला उपदेश किंवा सांगितलेल्या समजुतीच्या चार गोष्टीही त्यांना असह्य होत असाव्यात असे वाटते. या राशीची लहान मुले तर सध्या अत्यंत हूडपणाची व व्रात्यपणा करणारी झाली असावीत, असे वाटते. स्वभाव असा घडला असला तरी ही मंडळी उच्च बुद्धिमत्तेची असली पाहिजेत. त्यामुळे शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल, प्रगतिकारक, यश देणारा व मनोकामना पूर्ण करणारा असाच सिद्ध होईल, असे दिसते. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना, सैनिकी सेवेतील सेनाधिकाऱ्यांना व यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, तसेच अन्य कोणत्याही कार्यक्षेत्रात जिद्दीने कार्यरत असणारांना त्यांची कर्तबगारी व महत्त्वाकांक्षा सफ़ल होण्यास या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक समस्या, भांडणे, वाद, नातेवाईक मंडळींचा त्रास अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य यात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात नियोजित कार्यात अडथळे येत असल्यामुळे नैराश्य येऊन शारीरिक अनारोग्य होणेही शक्य दिसते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार लाभदायक होतील. तसेच शेतीवाडी असणारांना शेतीवाडीच्या व्यवसायात अपेक्षित अर्थलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मात्र अपेक्षित कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेलसे दिसते. असे असले तरी मंगळ-राहू-शनि कुयोगामुळे अपेक्षाभंग, अनारोग्य, मानसिक

अस्वस्थता निर्माण करणाऱ्या घटना घडणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर मन:शक्ती वाढण्यासाठी गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे" पठण करा.

**=====00000=====**